Estd - 1954

Office : 71346
Resi : 71794

" Education through self help is our motto " - KARMAVEER
Rayat Shikshan Sanstha's

# Sadguru Gadage Maharaj College,

OF

Arts, Science & Commerce ( Junior and Senior )

Vidyanagar **KARAD** 415 124 ( P. B. No. 3 )

Prin. [redacted] Dist. Satara ( Maharashtra )

( Affiliated to Shivaji University, Kolhapur )

डॉ. के बी. कुंदप
एम. ए. पीएच. डी.
प्रभारी प्राचार्य

---

Ref. No. Date : १७-६-९९

## प्रमाणपत्र

कु. वैशाली बाळासाहेब गुदगे ही या महाविद्यालयात सन १९९७/९८ या शैक्षणिक वर्षात एम. फिल [मराठी] पदवी अभ्यासक्रमासाठी नियमित विद्यार्थिनी होती तिने "पु. ल. देशपांडे यांच्या व्यक्ति चित्रणाचे विशेष" या विषयावर डॉ. कन्हैया कुंदप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंधिका पूर्ण केली आहे. तिची प्रबंधिका एम. फिल परीक्षेसाठी स्वीकारावी अशी मी शिफारस करतो.

K B Kundap

I/c प्राचार्य,
सदगुरु गाडगे महाराज कॉलिज, कराड.

**प्रा. डॉ. क.वा. कुंदप**
मराठी विभाग प्रमुख
एस्.जी.एम्. कॉलेज,
कराड - ४१५ १२४

# प्रमाणपत्र

कु.वैशाली बाळासाहेब गुदगे यांनी ''पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रणाचे विशेष'' या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली ही प्रबंधिका त्यांनी स्वतःच पूर्ण केली आहे. हा प्रकल्प विद्यापीठाच्या एम्. फिल. पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्यांचे प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व तो सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री वाटते.

**क.वा. कुंदप**
मार्गदर्शक

# प्रतिज्ञापत्र

"पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रणांचे विशेष" या विषयावरील सदरची प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग मी अन्यत्र कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

कराड

दिनांक :

**कु . वैशाली बाळासाहेब गुदगे**
अभ्यासक

## – अनुक्रमणिका –


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| प्रकरण पहिले :- | पु. ल. देशपांडे यांचे व्यक्तिमत्व | --- 1 - 45 |
| प्रकरण दुसरे :- | "व्यक्तिचित्रण" एक वाड्.मय प्रकार | -- 46 - 59 |
| प्रकरण तिसरे :- | "व्यक्ति आणि वल्ली" मधील व्यक्तिचित्रणाचे विशेष | -- 60 - 78 |
| प्रकरण चवथे :- | 'गणगोत' मधील व्यक्तिचित्रणाचे विशेष | -- 79 - 99 |
| प्रकरण पाचवे :- | उपसंहार | --- 100 - 110 |
| परिशिष्ट पहिले :- | पु.ल. देशपांडे यांचा साहित्य परिचय | -- 111 |
| परिशिष्ट दुसरे :- | पु.ल. देशपांडे यांचा जीवनपट | ---- 112 - 114 |
| परिशिष्ट तिसरे :- | रंगभूमी | -- 115 |
| | संदर्भग्रंथसूची | --- 116 - 119 |


---------

## – प्रास्ताविक –

पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रणाचे विशेष नोंदवत असताना पु.ल. देशपांडे यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्वाचा आढावा घेतला आहे. साहित्यात असलेले पु.लं.चे वेगळेपण पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. पु.ल. देशपांडे यांच्या साहित्यात अभ्यास करीत असताना प्रामुख्याने "व्यक्ति आणि वल्ली" व "गणगोत" मधील व्यक्तिचित्रणाचे विशेष स्वतंत्रपणे व साकल्याने या ठिकाणी अभ्यास करण्याचा कसोशीने व जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे.

व्यक्तिचित्रण रचनेमागील स्वरूप समजावून घेऊन पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय घडविला आहे. त्यात व्यक्तिचित्रणाचे विशेष आणि व्यक्तिचित्रण एक वाङ्‌मय प्रकार आहे हा अभ्यासाचा हेतू पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

पु.ल. यांच्या व्यक्तिचित्रणांच्या विशेषांचे एकत्र स्वरूप निश्चित करून दिले आहे. पु.ल. देशपांडे यांचे व्यक्तिमत्व अनेक पैलूंनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. पु.ल. देशपांडे यांच्या "व्यक्ति आणि वल्ली" व "गणगोत" मधील व्यक्तिचित्रणांचे विशेष काय? ते समग्र सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

शेवटी उपसंहारात व्यक्तिचित्रणांचा साकल्याने विचार केला आहे. परिशिष्टात

1. पु.ल. देशपांडे यांचा साहित्य परिचय
2. पु.ल. देशपांडे यांचा जीवनपट
3. रंगभूमी शेवटी संदर्भसूची इ. बाबी आल्या आहेत. अशा प्रकारे शोध प्रबंधिकेत संपूर्णता आणण्याचा जाणीवपूर्वक आणि अभ्यासपूर्वक प्रयत्न केला आहे.

---

## – म नो ग त –

पुरूषोत्तम लक्ष्मण देशपांडे यांच्याबद्दल पहिल्यापासून आदरभावना असल्यामुळे व एम्.ए. च्या वर्गात असताना त्यांचे समग्र साहित्य अभ्यासत असताना त्यांच्याबद्दल जिव्हाळा निर्माण झाला आणि पु.ल. देशपांडयांच्या साहित्याबद्दल अधिक अभ्यास व्हावा अशी मनात इच्छा निर्माण झाली. त्यांचे साहित्य वाचत असताना ही भावना अधिकच तीव्र झाली." पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रणांचे विशेष" ("व्यक्ति आणि वल्ली' व 'गणगोत' च्या आधारे) हा विषय एम्.फिल.च्या शोध प्रबंधिकेसाठी निवडण्यामागे मार्गदर्शक डॉ. कन्हैया कुंदप यांच्याशी विचार विनिमय करून विषय निश्चित केला.

पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रणांचे विशेष सांगत असताना पु.ल. देशपांडयांच्या व्यक्तिमत्वाचाही विचार या दृष्टीने केला आहे. त्याचप्रमाणे व्यक्तिचित्रण एक वाड्.मय; व्यक्तिचित्रणांचा समावेश आजपर्यंत कथा, चरित्र, निबंध अशा वाड्.मय प्रकारांचा उपप्रकार किंवा ललित गद्याचा एक भाग म्हणूनच होत आला. त्यामुळे त्याला स्वतंत्र वाड्.मय प्रकार असे कुणी संबोधले नाही. त्याची तात्विक चर्चा केली नाही किंवा सलग वाड्.मय इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला गेला नाही. त्या दृष्टीने व्यक्तिचित्रणांचा सर्वांगीण अभ्यास करून तो स्वतंत्र वाड्.मय प्रकार ठरतो का? याची पाहणी करणे, व्यक्तिचित्रणांची तात्विक चर्चा करणे, वाड्.मय प्रकारातील समान साहित्यतत्व, सर्वसमावेशक प्रकार, काव्य व वाड्.मय प्रकारांची निर्मिती, व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांचा फरक पाहणे, पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रणाचे विशेष यांच्या"व्यक्ति आणि वल्ली' व 'गणगोत'च्या आधारे पाहणे प्रस्तुत प्रबंधाचा विषय आहे.

व्यक्तिचित्रणाच्या अभ्यासामध्ये मुख्य अडचण त्यांच्या नावापासून आली. हा प्रकार अनेक संज्ञांनी ओळखला जातो. व्यक्तिचित्रणांच्या संदर्भात विचार करणारे एक स्वतंत्र प्रकरण जोडण्याचे ठराविले. व्यक्तिचित्रणांच्या संदर्भात दुसरी अडचण आली ती म्हणजे व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण हे भिन्न आहेत तसेच शब्दचित्र, स्वभावचित्र सर्व एकच मानले जाते, तसेच पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिमत्वाचा विचार करणे 'व्यक्ति आणि वल्ली' व 'गणगोत' मधील व्यक्तिचित्रणांचे विशेष पाहणे,

पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रणांचे विशेष हा शोध प्रबंधिकेतील विवेचन, तुलना सर्वमान्य होईलच असे नाही. परंतु या ठिकाणी एका अभ्यासू संशोधकाच्या भूमिकेतून हा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंधिकेला पूर्णत्व देण्यापर्यंत माझे आदरणीय व माननीय मार्गदर्शक गुरूवर्य डॉ. कन्हैया बाबूराव कुंदप प्रपाठक मराठी विभाग प्रमुख व प्रभारी प्राचार्य सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड यांनी केलेले बहुमोल मार्गदर्शन व घेतलेले अपार कष्ट, वेळोवेळी दिलेली प्रेरणा व सहकार्य यामुळे ही शोध प्रबंधिका पूर्णत्वास पोहचली. त्यांच्या या बहुमोल सहकार्याबद्‌दल मी त्यांची सदैव ऋणी राहणे मी माझे परमभाग्यच समजते. तसेच प्रबंधाच्या सिद्धतेच्या संदर्भात अनेकांचे सहकार्य मिळाले त्यांचा निर्देश हे माझे कर्तव्य आहे. माझ्या सर्व संशोधनामागे प्रेरणा आणि साहाय्य करण्यात माझे आई, वडील, काका, सुपनेकरमामा आणि कुटुंबीय मंडळी यांचा महत्वाचा वाटा आहे.

शोध प्रबंधिकेसाठी आवश्यक असणारी शोध पुस्तके ज्यांनी मिळवून दिली त्या सर्वांचे आभार मानणे हे माझे कर्तव्य आहे. एस.जी.एम. कॉलेजचे ग्रंथपाल व त्यांचे सहकारी, कराड नगरवाचनालय यांनी मला सहकार्य केले व वेळोवेळी संदर्भ ग्रंथ मिळवून दिले. त्याबद्‌दल मी त्यांचे आभार मानते.

या प्रबंधाचे टंकलेखन वेळेवर व सुबक आणि माझ्या सोयीने करून देणाऱ्या टंकलेखिका सौ. ज्योती नांदेडकर यांचे आभार मानावे तितके थोडेच आहे. सर्वांच्या सहकार्याने हे संशोधन कार्य पूर्ण होत आहे. सर्वांच्या सहकार्याबद्‌दल मनःपूर्वक आभार धन्यवाद!

**(वै.बा. गुदगे)**